महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २६३ /२०२४ दि. ०६/१२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत सिध्दामित इन्फ्रा प्रा.लि. यांचे कंपनी कडून मलवाहिनी चेंबर दुरुस्तीचे काम खानचाळ, बाबुभाई पेट्रोलपंप समोर, खोपट रोड, ठाणे येथे करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने वाहतूकीच्या दुष्टीने मिनाताई ठाकरे चौकाकडुन उथळसर नाका व कोलबाड कडुन खोपट सिग्नलकडे जाणारा रस्ता बंद करावा लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | माजीवाडा जंक्शनकडून खोपट सिग्नलकडे मिनाताई ठाकरे चौक मार्गे जाणाऱ्या बेस्टच्या बसेसेना गोकुळनगर **ब्रिजखालून जाण्यास 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** | सदरच्या बेस्ट बसेस हया गोकुळनगर ब्रिजवरुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | मिनाताई ठाकरे चौककडून खोपट सिग्नलकडे जाणाऱ्या मोठी व हलके वाहनांना **(दुचाकी वाहने वगळून) कोलबाड नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने कोलबाड नाका येथून डावे वळन घेवून उथळसर नाकामार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | कोलबाड रोड, प्रताप सिनेमाकडून खोपट सिग्नलकडे जाणाऱ्या मोठी व हलके वाहनांना **(दुचाकी वाहने वगळून) कोलबाड नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने कोलबाड नाका येथून सरळ जाऊन उथळसर नाक्याकडून उजवे वळन घेवून उथळसर रोडमार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | उथळसर नाक्याकडून कोलबाड नाक्यामार्गे खोपट सिग्नलकडे जाणाऱ्या मोठी व हलके वाहनांना **(दुचाकी वाहने वगळून) कोलबाड नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने कोलबाड नाका येथुन सरळ जावून कोलबाड रोड, हॉटेल फिशलॅंड मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि०७/१२/२०२४ रोजीपासून काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CS CamScanner

अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.</u>
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि ठाणेनगर वाहतूक उप विभाग.

CamScanner